
COSMOS IMPACT FACTOR



Category

DOWNLOAD LOGO

CONTACT US

SAMPLE CERTIFICATE

SAMPLE EVALUATION SHEET

## Journal Detail

| | |
|---|---|
| Journal Name | RESEARCH JOURNEY |
| ISSN/EISSN | 2348-7143 |
| Country | IN |
| Frequency | Quarterly |
| Journal Discipline | General Science |
| Year of First Publication | 2014 |
| Web Site | www.researchjourney.net |
| Editor | Prof. Dhanraj Dhangar & Prof. Gajanan Wankhede |
| Indexed | Yes |
| Email | researchjourney2014@gmail.com |
| Phone No. | +91 7709752380 |
| Cosmos Impact Factor | 2015 : 3.452 |

GIF GLOBAL IMPACT FACTOR



**Research Journey**

SJIF 2018:

Under evaluation

Area: Multidisciplinary

Evaluated version: online

Previous evaluation SJIF

2017: 6.261

2016: 6.087

2015: 3.986

2014: 3.009

The journal is indexed in:

Basic information

For Details Visit To : www.researchjourney.net     Price : Rs. 800/-

RESEARCH JOURNEY     January - 2019     SPECIAL ISSUE- 82 (A)


Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY


Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL


January - 2019

SPECIAL ISSUE- 82 (A)


# पटकथा लेखन : स्वरुप आणि चिकित्सा




अतिथी संपादक :

डॉ. इंद्रजित जाधव

प्राचार्य,

बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक संपादक :

डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर

मराठी विभाग प्रमुख

बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक सहसंपादक :

प्रा. पोपट माने, डॉ. पुरुषोत्तम काळे

मुख्य संपादक :

डॉ. धनराज धनगर


ISSN 2019

32


This Journal Is Indexed In :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
January-2019

## संपादकीय ....

दिनांक ४ जानेवारी २०१९ रोजी होणाऱ्या 'पटकथा लेखन : स्वरूप व चिकित्सा' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे पुस्तक संपादित करताना मला मनस्वी आनंद होत आहे. आजपर्यंत महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर मराठी विभागाने विविध विषयांवर यशस्वी व कल्पकपणे चर्चासत्रे व परिषदा आयोजित केलेल्या आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी एम.ए. भाग २ साठी दुसऱ्या सत्रात पटकथा लेखनाचा काही भाग आहे. म्हणून या विषयाचे अध्ययन व अध्यापन करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांना पटकथा लेखनाचे संदर्भ ग्रंथ दुर्मिळ आहे. पटकथा लेखना बाबत सर्वांगिण माहिती मिळावी, या उद्देशाने या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. चर्चासत्रासाठी हा विषय जाहीर झाल्यानंतर देशभरातील अनेक अभ्यासकांकडून या संदर्भातील उपविषय सूचविण्यात आले आहे. चित्रपट, मालिका, माहितीपट, लघुपट, चरित्रपट, इ. च्या पटकथा लेखनाचे स्वरूप या निमित्ताने या ग्रंथात विविध अभ्यासकांनी उलगडून दाखविले आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील पटकथेचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अनिल सपकाळ व डॉ. प्रवीण नारायण महाजन यांचे बरोबर चर्चा झाली आहे.

या राष्ट्रीय चर्चासत्रात देशभरातील विविध विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, महाविद्यालयात अध्यापन करणाऱ्या शिक्षक, अभ्यासकांनी आपले चिंतनपर शोधनिबंध पाठविलेले आहेत. विशेषतः या चर्चासत्राचे उद्घाटक ज्येष्ठ दिग्दर्शक श्री. श्रीनिवास भणगे यांचे उद्घाटनपर भाषण आहे. अलिगढ येथील मुस्लीम विश्वविद्यालयातील आधुनिक भाषा संकुलाचे प्रमुख आणि मराठी विभागप्रमुख डॉ. ताहेर पठाण यांचेही विचार या संपादनात आहे. याशिवाय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे यांचेही विचार या संपादनात आहे. पटकथेची विविध अंगाने व विविध दृष्टिकोनातून चिंतन करणारे शोधनिबंध या संपादनात समाविष्ट आहे. देशभरातील हिंदी, इंग्रजी, मराठी, कोंकणी, इ. भाषेतील एकूण ८३ शोधनिबंध यात आहे. देशातील विविध विद्यापीठात पटकथा लेखनांवर एम.फिल व पीएच.डी चे संशोधन करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांचे शोधनिबंध आहेत. मराठी व हिंदी रंगभूमी, मराठी चित्रपट क्षेत्रातील जाणकारांचेही विचार याग्रंथात समाविष्ट आहे.

या चर्चासत्राचे आयोजन व त्यानिमित्ताने ग्रंथ संपादन करताना आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मा. अजित दत्तात्रय काळे, उपाध्यक्ष मा. तुकाराम काळे, कार्याध्यक्ष मा. सुरेशशेठ काळे, सचिव अॅड. मुकुंद काळे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन डॉ. विलास काळे, तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी, संचालक, सल्लागार, प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव इ. सर्वांचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले. या चर्चासत्र व ग्रंथ संपादनासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आर्थिक सहकार्य केले आहे. रिसर्च जर्नीचे प्रकाशक, मुद्रक डॉ. धनराज धनगर यांनी हा ग्रंथ अधिक आकर्षक व सुबक करण्यासाठी प्रयत्न केला आहे. सर्व निबंधवाचकांनी वेळेत शोधनिबंध पाठविल्यामुळे उद्घाटन कार्यक्रमात या ग्रंथाचे प्रकाशन होऊ शकले. या ग्रंथातील शोधनिबंधातील विचार संबंधित अभ्यासकांचे आहेत. त्याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. या संपादनातात काही दोष, उणीवा असल्यास सहृदय अंतःकरणाने लेखी स्वरुपात कळवाव्यात. संपादनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व घटकांचे हार्दिक आभार मानण्यात येत आहे.

विशेषांक संपादक
प्रा.डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर
प्रा. पोपट माने
प्रा. डॉ. पुरुषोत्तम काळे



'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | A legendary Films and Film-Makers | Dr. Amina Khatun | 05 |
| 2 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | श्रीनिवास भणगे | 08 |
| 3 | चित्रपट सृष्टीला दृगोचर करणारी पटकथा | डॉ. तुकाराम रोंगटे | 13 |
| 4 | तमिळ चित्रपट : एक दृष्टीक्षेप | डॉ. ताहेर पठाण | 17 |
| 5 | कन्नड मराठी पटकथा आणि वास्तव | डॉ. श्रीपती रायमाने | 21 |
| 6 | पटकथा लेखन :एक परिचय | डॉ.प्रमोद भगवान पडवळ | 24 |
| 7 | डाक्टर जीवनावरील पटकथा लेखन | डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | 31 |
| 8 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. भास्कर टोके | 34 |
| 9 | चित्रपट माध्यम आणि आदिवासी समाज वास्तव | डॉ. वैजनाथ अनमुलवाड | 40 |
| 10 | पटकथा लेखन प्रक्रिया | सुरेश मेहेर | 45 |
| 11 | कथा ते पटकथा | डॉ. सुनील ग्रामपळ | 49 |
| 12 | ऐतिहासिक कादंबरी आणि पटकथा लेखन | प्रा.नागुणा कदम | 57 |
| 13 | माहितीपटाची संकल्पना आणि स्वरूप | डॉ. महेबूब सय्यद | 59 |
| 14 | माहितीपट निर्मितीचे तांत्रिक स्वरूप | डॉ. नवनाथ येठेकर | 65 |
| 15 | पटकथा लेखनप्रक्रिया | डॉ. राजेंद्र थंदारे | 69 |
| 16 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. अनिल बांगर | 73 |
| 17 | पटकथा लेखन स्वरूप | डॉ. वंदना नडे | 78 |
| 18 | भारतीय प्रागतिक चित्रपट विशेष संदर्भ : 'काला' | मदन जाधव | 80 |
| 19 | पटकथालेखन : संकल्पना आणि स्वरूप | डॉ. प्रमोद धिवार | 83 |
| 20 | नाटक, पटकथा : शैली आणि तंत्र | प्रा. प्रमोद पवार | 87 |
| 21 | पटकथा लेखन आणि नाट्यलेखन | प्रा.विकास बहुले | 91 |
| 22 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. शुभांगी बारवकर | 96 |
| 23 | लघुपट,माहितीपट आणि चित्रपट (सिनेमा) पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. अपूर्वा वेतकेकर | 98 |
| 24 | पटकथेतील व्यक्तिरेखाटन आणि संवाद स्वरूप विशेष | प्रा.अरविंद जाधव | 102 |
| 25 | पटकथा लेखन आणि नाट्य लेखन यातील साम्य-भेद | डॉ. एम. एन. बागुल | 106 |
| 26 | पटकथा लेखनाचे तंत्र | डॉ. हनुमंत भवारी | 110 |
| 27 | पटकथा लेखन प्रक्रिया | सायली जगताप | 113 |
| 28 | चित्रपट, लघुपट, माहितीपट | डॉ.उज्ज्वला मोर | 118 |
| 29 | पटकथा लेखन- एक कला | डॉ. केतकी मोतले | 122 |
| 30 | चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेमध्ये कॅमेऱ्याचे महत्त्व | डॉ.बाळासाहेब चव्हाण | 125 |
| 31 | पटकथा लेखनाचे तंत्र | प्रा.तुकाराम चव्हाण | 132 |
| 32 | पटकथा आणि दृश्य कला | प्रा.अमोगसिद्ध चेडके | 135 |
| 33 | मराठी चित्रपटसृष्टीची वाटचाल | डॉ.नारायण चौरे | 138 |
| 34 | पटकथा लेखन : संकल्पना व स्वरूप | डॉ.मधुकर बैकरे | 144 |
| 35 | साहित्यकृती व पारितोषिक प्राप्त चित्रपट | डॉ.सौ.मंगल डोंगरे | 147 |
| 36 | बाल नायकप्रधान श्यामची आई ते नाळ व्हाया टिंग्या : पटकथा लेखन | डॉ.दत्तात्रय डुंबरे | 151 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2[illegible] (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

चित्रपट एम. जी. आर. यांच्या रुपाने आले. एम. जी. आर. यांचा पहिला चित्रपट "सती लिलावती' १९३६ मध्ये आला. या पौराणिक चित्रपटाच्या नंतर एम.जी.आर. यांनी एम. ए. स्वामी यांचा चित्रपट "राजकुमारी मध्येही मुख्य भूमिका निभावली. अरेबियन नाइटच्या धर्तीवर बनलेला हा चित्रपट १९४७ मध्ये आला होता.

१९५० मध्ये बनलेली 'मतीरी कुमारी' पासून ते डी.एम.के. ला जोडले गेले आणि स्टार बनले. १९५० मध्ये 'मदुराई वीणा' व यानंतर १९५८ मध्ये 'नाडोडीमन्नन' इत्यादी बनले. 'मतिरी कुमारी' आणि 'मदुराई विणा' तमिळ इतिहासाच्या सुधारणावादी पुनर्लेखनाला प्रेरणा देत राहिली, या चित्रपटाच्या माध्यमातून कनिष्ठ वर्गापासून ते कृष्ण वर्णिय वर्गांच्या जातीचे प्रतिनिधित्व बनले. पुढे चालून एम. जी. आर. यांनी अण्णा द्रमुक नावाचा पक्ष स्थापन केला. १९७७ ला हा पक्ष सत्तेत आला. अण्णादुराई आणि एम.जी.आर. वर आधारित ऐश्वर्या राय यांनी एक चित्रपट आणला होता. या चित्रपटाचे नाव 'इरुवर' जो बॉक्स ऑफिसवर चालू शकला नाही, कारण यांचे अनेक तात्रिक कारणे होती. तमिळनाडूचे सर्व चित्रपट समाजाच्या सर्व प्रकारच्या अडचणींना सामावून घेणारे आहेत. एम. जी. आर. च्या नंतर शिवाजी गणेशन सर्वात लोकप्रिय अभिनेता राहिलेले आहेत व यांनी प्रत्येक प्रकारची भूमिका निभावलेली आहे. यांचा 'मुदल मारीयादी' हा चित्रपट खूप गाजला. यामध्ये असे आहे की, एका गावाच्या तरुणाचा एका दलित वर्गातील मुलीवर जीव जडतो आणि त्याचे प्रेमात रुपांतर होते. यांचे मुख्य पात्र जातीवर प्रहार करणारे आहेत. पूर्वीच्या प्रथानुसार आजही माणसाला दुसरी स्त्री ठेवणे एक प्रतिष्ठा वाटते.

**उपरोक्त विवेचनातून काही ठळक निष्कर्ष हाती येतात ते खालील प्रमाणे:**

१. आधुनिक काळामध्ये मनोरंजनाचे सर्वात लोकप्रिय साधन म्हणून चित्रपटाकडे पाहिले जाते.
२. मराठी चित्रपटाच्या इतिहासाइतकाच तमिळ चित्रपटाचा इतिहास जुना आहे.
३. दक्षिणेकडील तमिळ, तेलुगु, कन्नड आणि मल्याळम चित्रपटाचा समावेश तमिळ चित्रपटात होतो.
४. भारतीय चित्रपटाप्रमाणे तमिळ चित्रपट ही सुरुवातीला धार्मिक स्वरूपाचे राहिलेले आहेत.
५. विद्रोह आणि सामाजिक परिवर्तनाची हाके तमिळ चित्रपटात दिसते.
६. तमिळनाडूच्या माजी मुख्यमंत्र्यांनी चित्रपटासाठी पटकथा लेखन केल्याचे दिसून येते.
७. तमिळ चित्रपटाने तमिळ भाषिक आणि दक्षिणेकडील लोकांच्या मनावर आणि बुद्धीवर अधिराज्य केले आहे.
८. तमिळ मधील प्रांतीय भाषेचा प्रभाव तमिळ चित्रपटावर दिसतो.
९. तमिळ चित्रपटाच्या यशस्वी नायकाचे अंतिम लक्ष राजकारणात प्रवेश करणे हेच राहिले आहे.

तमिळ चित्रपट (कॉलीवूड) आणि त्याची प्रगतीचे सिंहावलोकन करण्याचा माझा अल्पसा प्रयत्न आहे. कला, साहित्य व संस्कृतीमध्ये कॉलीवूडने आपली भारतातच नव्हे तर जगात छाप सोडली आहे. साहित्यविश्वात या विषयावर फारसे लिखाण झाल्याचे सापडत नाही. बॉलीवूड नंतर चर्चा होते ती कॉलीवूडची. आजही भारतीय चित्रपटसृष्टीत कॉलीवूडचे योगदान अनन्य साधारण आहे.

संदर्भ:

१. पुनीत बिसारीया व राजनारायण शुक्ल, संपा., भारतीय सिनेमा का सफरनामा.
२. भारद्वाज विनोद, सिनेमा कल,आज,कल.
३. सिन्हा प्रसून, भारतीय सिनेमा : एक अनंत यात्रा.
४. माहेश्वरी ओंकारनाथ, हिंदी चित्रपट का गितीशास्त्र.
५. Christoper Williams, Cinema – The Beginning and future.



'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal

# कन्नड–मराठी पटकथा आणि वास्तव

डॉ. श्रीपती रायमाने
मराठी विभाग, प्रमुख
जी.आय. बागेवाडी महाविद्यालय, निपाणी
मो.नं.०९४४९५१३४७९

प्रास्ताविक :–

मराठी आणि कन्नड साहित्याने जशी सामाजिक आणि सांस्कृतीक क्रांती केली तसेच मराठी लेखक चित्रपटाला खाद्य आणि सामग्री पुरविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. तसे पाहिले तर साहित्य आणि चित्र या दोन वेगवेगळ्या कला आहेत. शब्द हे साहित्याचे माध्यम आहे तर दृश्य हे चित्रपट कलेचे माध्यम आ अनेक शब्द समूहातून साहित्याची निर्मिती होते, पण साहित्य कृती आणि चित्रपट या दोन्ही कला अत्यंत परस्पर पूरक आहेत. भाषा ही एक सामाजिक दळण–वळणाचे साधन असल्याने तिचा वापर साहित्य आणि चित्रपटा अवर्जून केला जातो.

भारतासारख्या विस्तीर्ण देशात अनेक भाषा आणि बोली अस्तित्वात आहेत. एकूण २२ भाषा प्रादेशिक भाषा म्हणून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद क्रमांक ३४५ आणि ३४६ च्या अंतर्गत मान्यता प्राप्त आहेत. सर्व भाषाचे साहित्य कार्य स्वागतिय आहे. सर्वच भाषांचे साहित्य भंडार हे श्रेष्ठ आणि समृध्द आहे. एक सुंदर भारत निर्माण करण्यात सर्व भाषाचे अमूल्य योगदान आहे.

देश स्वतंत्र झाल्यावर राष्ट्रभाषा हिन्दी म्हणून आपले स्थान आणि कार्य उत्तम केले असले तरी त्या बरोबर मराठी, तेलगू, तमिळ, कन्नड या भाषाचे कार्यही काय कमी नाही. या भाषांच्या लेखनामुळे पटकथा–कादंबरी लेखन हे चित्रपटाच्या माध्यमातून [illegible] पर्यन्त पोहोचले आहेत.

चित्रपट हे माणसांचे मनोरंजन करण्याबरोबर विश्वातील विचार समृध्द करणे, जगण्याची आस्था निर्माण करणे, साऱ्या विश्वातील संस्कृतीचे दर्शन व संवर्धन घडविणे आणि एकमेकांना जवळ आणण्याचे कार्य चित्रपट समुहाने केले आहे. साहित्य सिनेमा आणि समाजाचे दृढ नाते आहे. सामाजिक परिवर्तनाचे, लोक जागृती करण्याचे आणि बौध्दिक क्रांती करण्यात भारतीय सिनेमाने अविस्मरणीय कार्य केले आहे.

साहित्य हे चांगल्या चित्रपटाचे प्रेरणास्त्रोत असते. जीवनानुभवातून साहित्य निर्माण होते तर चित्रपट ही कला विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे अस्तित्वात आली. चित्रपट हा तंत्रज्ञान–विज्ञानामुळे निर्माण होत असला तरी तो पटकथेशिवाय अथवा चांगल्या कथानकाशिवाय निर्माण होत नाही.

अनेक भारतीय लोकप्रिय श्रेष्ठ चित्रपटांना प्रसिध्दी मिळाली ते चित्रपट दोन–तीन वर्षे गाजले ते गाजलेल्या आणि उत्तम साहित्य कृतीमुळेच. म्हणून आजही भारतीय साहित्याचा प्रभाव चित्रपटावर राहिलेला आहे.

**मराठी चित्रपट आणि वास्तव :–**

मराठी सिनेमा हा जितका लोकप्रिय ठरला तितकाच तो थोडा तिखट अनुभव ही देत आहे. १९५२ साली प्रदर्शित झालेला 'श्यामची आई' हा मराठी चित्रपट अत्यंत लोकप्रिय ठरला, अनेक पुरस्कारासह राष्ट्रपती पुरस्कार मिळाला हा चित्रपट मराठीतील प्रसिध्द साहित्यक आचार्य अत्रे यांनी तो दिग्दर्शित केला होता. मराठीतील थोर लेखक साने गुरुजी यांच्या 'श्यामची आई' या चरित्रात्मक कादंबरीवर साकारला आहे. प्रसिध्द